महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक
संचालक संवर्गातून पदावनत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**

शासन आदेश :- संलेको २०१६/प्र.क्र.२२९/ कोषा प्रशा- २
मंत्रालय, मुंबई- ४०००३२, दिनांक:- २० एप्रिल, २०१८.

वाचा :-१. वित्त विभाग, शासन आदेश, संलेको २०१६/प्र.क्र.२२९/कोषा प्रशा- २, दि. २५/९/२०१७
२. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे आदेश दि. ३/१/२०१८.
३. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. GP/OMK/५९९/२०१८,दि. १६/३/२०१८

**-: शासन आदेश:-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना सहायक संचालक संवर्गामध्ये संदर्भ क्र. १ येथील आदेशान्वये पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत. सदर पदोन्नती आदेशातील अ.क्र. ४ श्रीमती विद्या नि. पोंदकुले यांनी पदोन्नती आदेशाविरुध्द महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र. ९७७/२०१७ दाखल केला होता. सदर प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने संदर्भ क्र. २ येथे नमूद केलेल्या निर्णयानुसार तसेच मा. मॅटने दिलेल्या आदेशाविरुध्द शासनाने मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या रिट याचिका क्र. २२७४/२०१८ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने संदर्भ क्र. ३ अन्वये कळविलेल्यानुसार विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि. २७/३/२०१८ रोजी पुन्हा नव्याने घेण्यात आली. त्यामध्ये श्री. महेश पवार यांचे नावाचा दि. २९/८/२०१६ रोजीच्या विभागीय पदोन्नतीच्या बैठकीच्या वेळेच्या स्थितीनुसार विचार करण्यात आला. त्यावेळी श्री. पवार यांचेविरुध्द विशेष खटला क्र. ११/२०११ हा विशेष न्यायाधिश, अतिरिक्त सत्र न्यायाधिश, ठाणे यांचेकडे प्रलंबित असल्याने, त्यांना पदोन्नतीकरीता अपात्र ठरवून पदावनत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

२. विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार श्री. महेश पवार यांना सहायक संचालक पदावरून लेखाधिकारी पदावर या आदेशाच्या दिनांकापासून पदावनत करण्यात येत आहे. श्री. पवार यांच्या लेखाधिकारी पदावरील पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(शुभांगी शेठ)
सहसचिव, वित्त विभाग.

प्रति,

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
२) प्रधान सचिव (ले व को) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३) संबंधित अधिका-यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
४) संबंधित अधिकारी*
५) निवडनस्ती कोषा प्रशा- १ व २ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* संचालक, ले व को, संचालनालय, मुंबई यांचेमार्फत)